# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## पुणे विभागीय मंडळ,पुणे-४

क्रमांक पुविमं/शाखा-ब -गोपनीय/ 346/ दिनांक :-३०/०४/२०२६.

**परिपत्रक**

या परिपत्रकाद्वारे पुणे,अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्यातील सर्व मुख्याध्यापक/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रू-मार्च २०२६ परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांना गुणपडताळणी,उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती व पुनर्मुल्यांकन यासाठी अर्ज करण्याची सोय मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. पुनर्मुल्यांकन प्रक्रिया ही आपणा सर्वांना अवगत आहेच व ती प्रचलित पध्दतीप्रमाणे ती कार्यरत आहे.तसेच गुणपडताळणी व पुनर्मुल्यांकनासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक उपलब्ध करून द्यावेत.जेणेकरून गुणपडताळणी व पुनर्मुल्यांकनाची कामे वेळेत करणे शक्य होईल.

फेब्रू-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल माहे मे-२०२६ मध्ये जाहीर होणार आहे.व कनिष्ठ महाविद्यालयांना उन्हाळी सुट्या राहतील तेव्हा मार्च २०२६ परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मुल्यांकन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे आवश्यक असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसात पुनर्मुल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा असल्याने कनिष्ठ महाविद्यालयामार्फत मंडळ कार्यालयास अभिप्राय सादर करावयाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना सदर कामासाठी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शिक्षक /प्राध्यापक उपलब्ध राहतील अशी व्यवस्था आपण करावी विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची नोंद घ्यावी.

पुनर्मुल्यांकन करण्यासाठीच्या अटी शर्ती व सूचना मंडळाच्या https:// mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

MBRaut 30.4.26

(डॉ.मिनाक्षी राऊत )
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११ ००५.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१.मा.शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग पुणे

२.शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे-अहिल्यानगर-सोलापूर